# महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी

दिनांक :- २४/०८/२०१६

## नोटीस (२०१६-२०१७)

शै. वर्ष २०१६-१७ साठी अ.जा. (SC), वि.जा.भ.ज. (VJNT), वि.मा.प्र. (SBC), इ.मा.प्र. (OBC)आणि अनु.जमाती (ST) या प्रवर्गातुन व शासन कोटयामधून प्रवेशीत प्रथमवर्ष अभियांत्रिकी,थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच प्रथम व द्वितीय वर्ष एम.बी.ए. या वर्गातील शिष्यवृत्ती /फ्रि शीप धारक (अ.जा.(SC),अनु.जमाती (ST)सोडून) विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न हे रू ६.00 लाखा पेक्षा कमी आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांनी (Except TFWS) खाली दिलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरून खालील अनुक्रमानुसार आवश्यक त्या कागदपत्रांसहीत दिनांक १३/०९/२०१६ पर्यंत विद्यार्थी-विभागात जमा करावेत , सदर कागदपत्रे स्कॅन करून (फाईल साईज ५०० केबी पेक्षा कमी असावी) ऑनलाईन अपलोड करावीत. ऑनलाईन अर्ज भरतांना अनेकवेळा खूप अडचणी येतात व अर्ज भरला जात नाही,म्हणून विद्यार्थ्यांनी त्वरीत अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करून त्याची हार्ड कॉपी एमआयटी कार्यालयातील विद्याथी-विभागात पुढील तपासणी करीता वेळेत सादर करावेत. कागदपत्रांसहित अर्ज दाखलकरण्याची जबाबदारी त्या त्या विद्यार्थ्यांवर राहील यास महाविद्यालय जबाबदार राहाणार नाही,याची कृमया नोंद घ्यावी.

* अ.जा.(**SC**), वि.जा.भ.ज.(**VJNT**), वि.मा.प्र.(**SBC**), इ.मा.प्र. (**OBC**) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी संकेत स्थळ (LINK)- **mahaeschol.maharashtra.gov.in**

* अनु.जमाती (**ST**) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी संकेत स्थळ (LINK)-

**etribal.maharashtra.gov.in**

* **List of documents to be attached along with online form print out as per following sequence**

1) **Scholarship / Freeship Online Form (Hard Copy Signed)**
2) जाहिर आवाहन –आधारकार्ड आणी बॅंकेचे खाते क्रमांक माहिती (Annexure-I) संकेत स्थळावरून डावूनलोड करणे व पूर्ण भरलेल्या सही शिक्यानिशी जोडावे.
3) **Cap Seat Admission Letter (Allotment Letter) Photocopy**

MAEER MIT PUNE

4) Caste Certificate (Attested Photocopy )
5) Validity Certificate (Attested Photocopy )
6) Non- Creamy Layer Certificate (Attested Photocopy Valid for 31st March, 2017 applicable for VJNT,SBC & OBC)
7) Income Certificate of previous financial year of the first admission year in MIT :
   a) For salaried parents : (Annual Salary Certificate in Form No.16)
   b) For Businessmen parents : (Income Tax Return (ITR-V )
   c) For Farmar & Other : (Income Certificate signed by Tahasildar)
8) Privious Year Marksheet (Attested Photocopy )
9) Leaving Certificate / Transfer Certificate (Attested Photocopy )
10) SSC Marksheet (Attested Photocopy )
11) HSC Marksheet (Attested Photocopy )
12) Nationality (Attested Photocopy )
13) Domicile (Attested Photocopy )
14) Aadhar Card (Attested Photocopy )
15) Gap Certificate in Original (if Applicable)
16) Fees challan receipt Photocopy
17) Photocopy of first page of Pass book regarding saving Bank A/C in Bank of India in the name of the Student. (Please note details of Bank Account Number, IFSC & MICR Code is necessary)

जे विद्यार्थी ऑनलाईन अर्ज भरून त्याची प्रत आवश्यक कागदपत्रांसहीत महाविद्यालयात जमा करणार नाहीत त्यांना शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्ती/फ्रि शीप चा लाभ मिळू शकणार नाही. तसेच फॉर्म न भरल्यास स्वत: विद्यार्थी जबाबदार राहतील व अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे पूर्ण शुल्क(फी)भरावे लागेल याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

MAEER MIT PUNE

Dr. L. K. Kshirsagar
Principal
Maharashtra Intitute of Technology
Pune - 411 038

# "जाहीर आवाहन"

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती आणि राज्य शासनाची शिक्षण फी परिक्षा फी मिळणेसाठी आवेदन पत्र भरतांना आधारकार्ड, बँकेचे खाते क्रमांकाची माहिती सादर करणेबाबत विद्यार्थी, पालक व महाविद्यालयांना आवाहन**

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत प्रत्येक वर्षी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागासप्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती आणि राज्य शासनाची शिक्षण फी, परिक्षा फी या योजनांचा लाभ देण्यात येतो. सदर योजनेचा लाभ घेणेसाठी विद्यार्थ्यास विभागाच्या https://mahaeschol.maharashtra.gov.in या पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरलेनंतर विद्यार्थ्यांनी आपला मागास प्रवर्ग, शैक्षणिक अर्हता, रहिवास, उत्पन्न, मागील वर्षाचा उत्तीर्ण दाखला या विषयाचे पुरावे महाविद्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. त्या आधारे विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती / शिक्षण फी, परिक्षा फीसाठी पात्रता निश्चित होते.

पात्र विद्यार्थ्यास मिळणारी शिष्यवृत्ती (निर्वाह भत्ता) हा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर आणि शिक्षण फीची रक्कम महाविद्यालयाच्या बँक खात्यावर परस्पर जमा केली जाते. अधिकृत बँक खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणेसाठी खालील बाबींची पुर्तता विद्यार्थी / पालक / महाविद्यालयाने करणेबाबत जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

1. विद्यार्थ्यांने आपल्या आधार क्रमांकाची खात्री पटविणेसाठी आधारकार्डाची प्रत प्रस्तावा सोबत जोडावी.
2. ज्या बँकेमध्ये खाते उघडले आहे त्या बँकेच्या खाते क्रमाकाची खात्री होणेसाठी पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत जोडावी.
3. आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न केले असलेबाबतचा पुरावा म्हणून बँकेकडून आधार संलग्नता केलेबाबतची पावती (आधार सिडींग स्लीप) सोबत जोडावी.
4. विद्यार्थी / पालकांनी प्रस्तावासोबत आधार क्रमांक आणि तो बँकेशी संलग्न केल्याबाबतचा पुरावा जोडला आहे. अशा विद्यार्थ्यांच्या खात्यावर, त्यांचा आधार क्रमांक वैध असल्याची खात्री करुन शिष्यवृत्तीची रक्कम तसेच महाविद्यालयाच्या खात्यावर शिक्षण शुल्काची रक्कम प्राधान्याने जमा केली जाईल.

तेव्हा सर्व विद्यार्थी / पालक आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांना आवाहन करण्यात येत आहे की, उपरोक्त कागदपत्रे पोर्टल सुरु होणेपूर्वी तयार ठेवावीत. जेणे करुन ऐन वेळी धावपळ होणार नाही.

* * *

Annexure - I

The Branch Manager
Bank ..........................................
Branch......................................

Date:______________

Dear Sir / Madam,

**Bank Account No ....................................... in my name Linking of Aadhaar / UID Number with the account**

I am maintaining a Bank Account number ........................................... with your Branch (Branch name.......................................). I submit my Aadhaar number and voluntarily give my consent to;

- Seed my Aadhaar/UID number issued by the UIDAI, Government of India in my name with my aforesaid account.
- Map it at NPCI to enable me to receive Direct Benefit Transfer (DBT) from Government of India in my above account. I understand that if more than one Benefit transfer is due to me , I will receive all Benefit Transfers in this account
- Use my Aadhaar details to authenticate me from UIDAI
- Use my mobile number mentioned below for sending SMS alerts to me

The particulars of the Aadhaar/ UID letter are as under:
Aadhaar/ UID number: .........................................................
Name of the Aadhaar Holder as in Aadhaar card: ..................................................................................

I have been given to understand that my information submitted to the bank herewith shall not be used for any purpose other than mentioned above, or as per requirements of law.

Yours faithfully,

(Signature/ Thumb impression of the account holder)
Name: ........................................
Mobile No. ..............................
Email: ........................................
Enclosure: copy of the Aadhaar letter self-attested

---

**Confirmation of insertion / linking of Aadhaar number with Bank Account:**

The Account number ................................................ of Shri / Smt / Kum. ........................................................... with ...................................... (Bank) Branch ............................................... has been linked with Aadhaar/UID number ........................................ And mobile number.........................................

Date ................

**(Bank's authorized official)**

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची उत्पन्न मर्यादा वाढविणेबाबत .

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र. इबीसी -२०१४/प्र.क्र.९६ /शिक्षण-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २० ऑगस्ट, २०१६.

वाचा- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६

प्रस्तावना :

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लक्ष वरुन रुपये ६.०० लक्ष करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ४.५० लक्ष वरुन रुपये ६.०० लक्ष करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सुधारित उत्पन्न मर्यादा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय/चतुर्थ वर्षात शिकत असणा-या विद्यार्थ्यांना लागू करण्यात येत आहे.

३. सदर योजनेच्या अटी/शर्ती शासन निर्णय क्रमांक इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६ नुसार राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०८२०१६०७४३८१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh
Ramchandra
Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400051, st=Maharashtra, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2016.08.20 16:08:37 +05'30'

(दि.रा.डिंगळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१)मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२)मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३)मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा.मंत्री, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
७) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
८)मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९)अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०)अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११)अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२)अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३)प्रधान सचिव (पदुम), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व विशेष मागास वर्ग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६)संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७)संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८)महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
१९)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२०)महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२१)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२)सर्व प्रादेशिक उपायुक्त/सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग,
२२)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२३)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२४) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१४/अर्थ-५), मंत्रालय, मुंबई.
२५) कक्ष अधिकारी, विधानमंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२६) कक्ष अधिकारी, विधानमंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२७)निवड नस्ती ( कार्यासन शिक्षण-१).